
# अन्नदाता

डिसेंबर २००८ किंमत १२ रु.



## निमखाऱ्या पाण्यातील कोळंबी व गोड्या पाण्यातील मत्स्यशेती फायदेशीर












डाळिंबाचं दाणं दाट... जैन ठिबकची करामत फास्ट!

जैन ठिबक®
पाणी थेंबानं पीक जोमानं®



जैन इरिगेशन सिस्टिम्स् लि., जैन प्लास्टीक पार्क, पो. बॉ. ७२, जळगांव - ४२५००१,
फोन : ०२५७-२२५८०११, ई- मेल: jisl@jains.com; वेबसाईट: www.jains.com

शासकीय नियमानुसार
अनुदान उपलब्ध

कार्यालय: अहमदनगर: ०२४१-२४१५४८१; अमरावती: ०७२१-२६७४७३७; औरंगाबाद: ०२४०-२३४५१३६; लातूर: ०२३८२-२२४०९८; मुंबई: ०२२-२२१२९०९०; नागपूर: ०७१२-६४५०८४३; नांदेड: ०२४६२- २७४०४६; नाशिक: ०२५३-२५९७५०३; पंढरपूर: ०२१८६-२२२६३१; रत्नागिरी: ०२३५२-२३००३३; सांगली: ०२३३-२३३३४७७; सोलापूर: ०२१७-२३५७३९५; ठाणे: ०२२-२५४४३९९२.

जैन पाईप | जैन ठिबक | जैन पीई पाईप | जैन स्प्रिंकलर | जैन टिश्यूकल्चर | Chapin Drip Irrigation USA | API Drip Irrigation USA | PEPCO Drip Irrigation USA | NAANDANJAIN Drip Irrigation ISRAEL

प्रदर्शन, विविध योजना, पिकांच्या माहितीचे व तंत्रज्ञानाचे संगणकीय सादरीकरण याद्वारे तंत्रज्ञान प्रसार व जागृती करण्यात येणार आहे.

श्री पवार याप्रसंगी म्हणाले की, रिटेल क्षेत्रातीलबदल व मॉल यांना विरोध न करता आपला शेतमाल थेट त्यांच्यापर्यंत पोचविण्याचे तंत्र शेतक-यांनी आत्मसात केले पाहिजे. उर्जामंत्री दिलीप वळसे-पाटील, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष वल्लभ बेनके, कृषि आयुक्त प्रभाकर देशमुख, राज्य कृषि शिक्षण व संशोधन परिषदेने उपाध्यक्ष विजय कोलते, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा वैशाली आबणे तसेच सोपान कांचन, अप्पासाहेब कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भीमराव उल्मेक याप्रसंगी उपस्थित होते.

**कृषि विद्यापीठाचे डॉ. मेहता आणि डॉ. शिनगारे यांची राष्ट्रीय सायंटिफीक सोसायटीच्या कार्यकारी परिषदेवर निवड**

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय मेहता यांची उपाध्यक्ष या उच्चस्तरीय पदावर निवड करण्यात आली आहे. डॉ. मेहता यांना यावर्षी "राज्यस्तरीय वसंतराव नाईक कृषि पुरस्कार २००८" ने सन्मानित करण्यात आले आहे.

याच परिषदेवर डॉ. बा.सा.कों.कृ. विद्यापीठाच्या खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि. रायगड येथील सहयोगी प्राध्यापक आणि वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा. डॉ. प्रकाश शिनगारे यांची "इंडियन सोसायटी ऑफ कोस्टल ॲग्रीकल्चरल रिसर्च" या राष्ट्रीय सायंटीफिक सोयायटीच्या कार्यकारी परिषदेवर सदस्य म्हणून २००८ ते २०११ या तीन वर्ष कालावधीसाठी निवड करण्यांत आलेली आहे.

डॉ. मेहता यांनी खार जमिनीशी निगडीत, खार जमीन संशोधन केंद्र, पनवेल, जि. रायगड येथे १९८६ ते १९९६ या कालावधीत खार जमीन शास्त्रज्ञ व केंद्र प्रमुख म्हणून कार्य केले आहे. त्यावेळी या सायंटिफीक सोसायटीच्या कार्यकारी परिषदेवर सदस्य म्हणून अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. त्याच काळात त्यांनी समुद्रकिना-या लगतच्या खार जमिनीच्या कृषि संबंधित समस्या व त्यावरील उपाययोजना यावर भरीव कामगिरी केली असून त्यावर विविध शास्त्रीय शोध निबंध तसेच शेतकरी आणि विस्तार कार्यकर्त्यांसाठी मराठी पुस्तकही लिहीले आहे. सध्या कोंकण कृषि विद्यापीठाच्या सर्वोच्च पदी कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.

**उच्च तंत्रज्ञानाला जवळ केल्याशिवाय शेतक-यांचा उद्धार नाही**

केंद्रीय कृषि मंत्री शरद पवार



जळगांव दि. २१ (प्रतिनिधी) - भारतातील ६४ टक्के लोक शेती व्यवसायावर अवलंबून असून त्यांची प्रगती झाल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. देशाची प्रगती जर करायची असेल तर शेती व शेतक-यांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल असे निस्संदिग्ध प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी केले. शेतकरी हे केवळ अन्नदाताच नाही तर ती एक मोठी क्रयशक्ती आहे. जवळपास ६० टक्के शेतकरी वर्गाच्या माध्यमातून असलेली मोठी शक्ती बाजारपेठेपासून जर दूर असेल तर प्रगती कशी होईल असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

'पद्मश्री कै.डॉ. आप्पासाहेब पवार आधुनिक कृषि उच्च तंत्र पुरस्कार' प्रदान सोहळ्यात ते बोलत होते. महाराष्ट्राचे कृषि मंत्री बाळासाहेब थोरात, उच्च व तंत्र शिक्षण, उर्जा मंत्री दिलीप वळसे पाटील, जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. भवरलालजी जैन, खा. वसंतराव मोरे, खा. हरिभाऊ जावळे, आ. सुरेशदादा जैन, जैन चॅरिटीज्चे विश्वस्थ ना.धों. महानोर, पुरस्कार प्राप्त सत्कारमूर्ती, विश्वासराव आनंदराव पाटील व त्यांच्या धर्मपत्नी सौ. निर्मलाबाई, भगवानराव यशवंतराव क्षीरसागर व त्यांच्या धर्मपत्नी



सौ. तुळसाबाई, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. शंकरराव मगर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

आप्पासाहेब पवार, अण्णासाहेब शिंदे, स्वामीनाथन सारख्या कृषि तज्ज्ञांच्या योगदानामुळेच अन्नधान्याच्या बाबतीत आपला देश स्वयंपूर्ण झाला. तथापि, पुनः या क्षेत्राकडे दुर्लक्ष झाल्याने दुर्दैवाने अन्नधान्य आयात करण्याची वेळ आली यावर मात करण्यासाठी अधिकाधिक उत्पन्न घेण्याशिवाय पर्याय नव्हता. कृषि क्षेत्रातील उच्चतंत्र व पाण्याच्या नियोजनामुळेच आज देश पुन्हा धान्याच्या कोठाराने भरले आहे, असे पवार यांनी सांगितले.

आप्पासाहेब पुरस्काराच्या निमित्ताने निवड झालेल्या शेतक-यांच्या माध्यमातून पुन्हा एकदा कोरडवाहू शेतीही फायद्याची ठरु शकते हे सिद्ध झाले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत पाटील व क्षीरसागर या शेतक-यांनी उत्तम काम केले आहे. केवळ स्वतःचे शेतच नव्हे तर इतरांचेही जीवन समृद्ध होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. अशा आदर्श शेतक-यांची निवड झाल्यामुळे पुरस्काराचीही प्रतिष्ठा वाढली असल्याचे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. कोरडवाहू शेतीतूनही अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी ठिबक सिंचन हा मूळ मंत्र आहे. हा आधुनिक कृषि उच्च तंत्राचा मंत्र आप्पासाहेबांनी दिला.

या पुरस्काराच्या माध्यमातून दोन्ही शेतक-यांनी अधिक काम करण्याची उर्मी दाखविली आहे. इतर शेतक-यांसाठी ते प्रेरणास्थानी आहेत. इतर शेतक-यांना प्रेरणा देण्याचे, ठिबक सिंचन सारख्या उच्च तंत्राचा प्रसार करण्याचे कार्यही ते करत आहेत. उच्च तंत्र प्रसाराच्या या कार्याची ख-या अर्थाने राष्ट्रीय गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.